REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २१ जून, १९४४ अंक २५

## एकहि लक्षाधीश नाहीं.

### वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या

रजतमहोत्सव प्रसंगीं सर विश्वेश्वर अय्यांनीं असे प्रशंसोद्गार काढले कीं या कंपनीनें एकहि लक्षाधीश निर्माण केला नाहीं. याचा अर्थ असा कीं या कंपनीचा कारभार कांहीं थोड्या लोकांच्या फायद्यासाठी नसून तो सामान्य जनतेचें हित डोळ्यापुढें ठेवून स्वार्थनिरपेक्ष कर्तव्यबुद्धीनें चालला आहे.

**कंपनीचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब चिरमुले**

यांनीं कंपनीच्या स्थापनेपासून सुरू केलेली निरपेक्ष सेवेची ही परंपरा पहिल्यापासून आजपर्यंत अखंडपणें चालूं असून पुढेंही ती अशीच चालूं राहील असा विश्वास आहे.

पुणें शाखा:—
१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २

मॅनेजर
वेस्टर्न इंडिया
विमा कंपनी, लि., सातारा.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

# WANTED

Agents to represent Sun Life Assurance Co. Of Canada in Ahmednagar, Jalgaon, Kolhapur, Nasik & Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Full training will be given.

Apply to:—

Mr. P. V. Lad,

Unit Organizer.

Sun Life Of Canada, Laxmi Rd., POONA 2.

## GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS.

SERVANTS OF INDIA SOCIETY'S HOME, POONA 4.

**ADMISSIONS TO STUDENTS**:—reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics. One scholarship of Rs. 25 p. m. to be awarded to research student.

D. R. GADGIL,

*Director.*


## विविध माहिती

### गिरण्यांत कपाशीचा उठाव कमी झाला

हिंदी गिरण्यांत एप्रिल १९४४ मध्यें एकूण ३,१०,८१४ गांठी हिंदी कपाशीचा उठाव झाला. १९४३ च्या एप्रिलमधील उठावाचे मानानें हा उठाव ६६,००० गांठींनीं कमी आहे.

### मुंबई कार्पोरेशनची मुदतवाढ

मुंबई कार्पोरेशनची मुदत १ एप्रिल, १९४२ रोजीं संपत होती, ती पुढें १ एप्रिल १९४५ पर्यंत वाढविण्यांत आली. आतां ती त्याच्याहि पुढें २ वर्षें, म्हणजे १ एप्रिल, १९४७ पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

### मुंबईंत तलम कापडाचा तुटवडा

कापडाचा मुबलक पुरवठा असतांहि, तें कापड मुंबईमधील लोकांच्या आवडीस उतरणारें नसल्याकारणानें, मुंबई शहरांत धोतरें, साड्या वगैरेचा तुटवडा भासूं लागला आहे.

### २ लक्ष टन धान्याच्या साठ्याची सोय

सरकारी धान्याच्या साठ्याची व्यवस्था प्रमुख केंद्रांतून करण्यांत येत आहे. कराची येथील गोदामांतील जागा दुपटीनें वाढविण्यांत आली आहे. पंजाब, मध्यप्रांत, ओरिसा, आसाम व ईस्टर्न स्टेटस एजन्सी ह्यांत बांधण्यांत यावयाच्या गोदामांत २ लक्ष टन धान्य मावूं शकेल. ह्या गोदामांच्या बांधणीचा खर्च मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें निम्मेनिम वांटून घेतील. पंजाबमध्यें आणखी ६० हजार टन धान्यास पुरेल एवढी जागा भाड्यानें घेण्यांत आली आहे.

## बिनतारी संदेशानें चालणारीं विमानें

ग्रेट ब्रिटनचे गृहमंत्री मि. मॉरिसन् यांनीं कॉमन्स सभेमध्यें युद्धामधील एका नवीन घटनेसंबंधीं नुकतेंच निवेदन केलें. जर्मन विमानदल बिनतारी संदेशानें चालणारीं विमानें वापरूं लागलें आहे असें त्यांनीं सांगितलें. यासंबंधीं कांहीं माहिती पुढें देत आहोंत.

बिनतारी संदेशानें वाहनें काबूंत धरण्याचे प्रयत्न १९१० सालापासून करण्यांत येत आहेत, व युद्धापूर्वींच या शास्त्रांत बरीच प्रगति झाली होती. अशा वाहनांचा प्रयोगार्थ वा नेमबाजी करण्यासाठी उपयोग केला जाई. पाण्यावर चालणाऱ्या बोटी, आकाशांत उडणारीं विमानें व जमिनीवर चालणारे रणगाडे या तीनहि तऱ्हांच्या वाहनांवर वरील प्रकारच्या यंत्रांची योजना यशस्वी झाली होती. विशेषतः नेमबाजी शिकविण्यासाठीं या वाहनांचा मोठ्या प्रमाणावर सर्व राष्ट्रांकडून उपयोग केला जाई व याचें कारणहि उघड आहे; कारण अशा वाहनांवर मनुष्य राहण्याची जरूरी नाहीं व अशा वाहनास चुकून गोळी लागल्यास मनुष्यास धास्ती नाहीं.

अशा वाहनांत (१) रेडियो व (२) रेडियोनें येणाऱ्या संदेशाप्रमाणें वाहनास काबूंत धरणारीं यंत्रें, हीं बसविलेलीं असतात. यांस फारच थोडी जागा लागते. त्यामुळें इतर सर्व जागा यंत्रें अथवा दारूगोळा भरण्यासाठी उपयोगी पडते. अशीं वाहनें दूर अंतरावरून बिनतारी संदेशानें नियंत्रिलीं जातात.

सूक्ष्मभेद करावयाचा म्हटला तर असें म्हणतां येईल कीं, जर्मनीनें नुकत्याच वापरलेल्या आकाशयानांस हल्लीं समजल्या जाणाऱ्या अर्थानें "विमानें" म्हणतांच येणार नाहीं, तीं खरोखर "उडते बॉंब" होत. कारण तीं परत यावीं या बुद्धीनें केलेलींच नाहींत. आपल्या विशिष्ट लक्ष्यावर आलीं म्हणजे तीं बंद पडतात, खालीं आदळतात व तेथें त्यांचा स्फोट होतो. त्यांची प्रेरक शक्ती काय आहे याचा अजून पत्ता लागलेला नाहीं. कारण तीं खालीं आल्याबरोबर छिन्नविच्छिन्न होतात. या विमानांत (१) नेहमीसारखें पेट्रोलवर चालणारें इंजिन, (२) बॅटरीवर चालणारी विजेची मोटर, (३) ज्वालाग्राही रासायनिक द्रव्यें (रॉकेट) किंवा (४) तीव्र दाबानें भरलेली हवा यांपैकीं कोणतें तरी एक प्रेरक साधन असावें असा तर्क आहे. दोन महिन्यांपूर्वीं इटालियन आघाडीवर जर्मनीनें बिनतारी संदेशानें चालणारे लहान रणगाडे वापरल्याचें वाचकांस माहीत असेलच.

ह्यां विमानांत अर्थातच कांहीं दोष आहेत. प्रथमतः त्यांना जरुर तेथेंच हल्ला करतां येईल अशी खात्री बाळगतां येणें कठीण आहे. कारण संदेश पाठवणारास हल्ल्याची जागा दिसत नाहीं. परंतु संदेश पाठवणारासहि एका विमानांत बसविणें शक्य आहे. दुसरें असें, कीं शत्रूस तीच युक्ती साधून तें वाहन आपल्या काबूंत आणितां येईल, व फेकलेलें अस्त्र उलटवितां येईल!

ह्या विमानांचे फायदेहि कांहीं आहेत. त्यांत मनुष्याची जरूरी नसल्यानें हवाईदलांतील मनुष्यबळाची बचत होते, एवढेंच नव्हे तर विमान पुष्कळच हलकें व स्वस्त करतां येतें. हीं विमानें करण्यास हलक्या प्रतीची कारागिरी व कमी दर्जाचें सामान वापरतां येतें, कारण हीं विमानें एकंदर एकदांच वापरावयाचीं असतात, व शिवाय जरी कांहीं बिघडलें तरी मनुष्यहानि होत नाहीं; एक विमान वायां जातें एवढेंच. अशा नाविन्यपूर्ण अस्त्रानें शत्रूजनतेंत गोंधळ माजेल अशी कदाचित् जर्मनीची कल्पना असावी, परंतु ती फोल ठरली आहे.

कोठल्याहि युक्तिवर प्रतियुक्ति असतेच व ब्रिटननें या बाबतींत बरीच आघाडी मारली आहे असा मि. मॉरिसन यांनीं निर्वाळा दिला आहे. मित्रराष्ट्रें याही नव्या अस्त्रास यशस्वीपणें तोंड देतील असें समजण्यास हरकत नाहीं.

## अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... १९४
२ रेडिओनें चालणारें विमान १९४
३ हिंदी स्टर्लिंग शिलकांचा वाद ... ... ... १९५
४ बँकांच्या कायद्यांत दुरुस्ती १९६
५ स्फुट विचार .. ... १९७
हिंदी बँकांचें मंडळ बनविण्याची योजना—अमेरिकन चांदी हिंदुस्थानांत आली—हिंदी चित्रपटांचा धंदा—म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.—मराठा चेंबरची वार्षिक सभा—सर सी. पी. रॉय ह्यांचें निधन
६ श्री. चिरमुले यांचा सन्मान. ... ... १९९



# अर्थ

बुधवार, ता. २१ जून, १९४४


## हिंदी स्टर्लिंग शिलकांचा वाद

### ब्रिटिश धंदेवाल्यांचा कांगावा

अमेरिकेंत भरणारी जागतिक चलन विषयक परिषद जवळ येत चालली आणि हिंदुस्थानचे प्रतिनिधी तिच्या चर्चेंत भाग घेण्यासाठी निघण्याच्या तयारीस लागले अशावेळीं ह्या देशाचा पैसा लंडनमध्यें स्टर्लिंग चलनाच्या स्वरूपांत साचला आहे तो इकडे परत आणण्याच्या मार्गासंबंधाच्या वादाची वावटळ उठली आहे. ह्या वावटळीचे वारे इंग्लंडमध्यें जोरानें वहात असून कॉमन्स सभेंतहि गडगडाट झाला आहे. ब्रिटिश व्यापारविषयक पत्रांनीं प्रस्तुत प्रश्नावर झोड उठवली आहे आणि त्याचा निकाल इंग्लंडच्या दृष्टीनें कसा झाला पाहिजे ह्याविषयीं सूचना केल्या आहेत. हिंदुस्थानांतहि त्यासंबंधांत पुढारी धंदेवाल्यांनीं स्वतःच्या मताचें प्रदर्शन करून ब्रिटिश पत्रें व प्रख्यात चलन तज्ञ लॉर्ड केन्स ह्यांच्या सूचनांवर टीकेचा भडिमार केला आहे. हाउस ऑफ कॉमन्समध्यें ह्या वादाचा प्रतिध्वनी उठून त्या बाबतींत ब्रिटिश फडनवीस, सर जॉन अँडरसन, ह्यांस सभासदांनीं प्रश्नहि विचारले. त्यांस उत्तर देतांना फडनवीसांनीं अशी माहिती दिली कीं १९३९ सालाच्या मार्च अखेरीस हिंदुस्थानचें स्टर्लिंगमध्यें फेडलें जावयाचें सरकारी कर्ज सुमारें ३५ कोटि पौंड होतें तें १९४४ च्या मे महिन्याच्या शेवटीं सुमारें अडीच कोटि पौंडांवर आलें. म्हणजे तें जवळ जवळ सबंद फिटलें गेलें. सर जॉन आणखी असें म्हणाले कीं हिंदुस्थानांतील चलनी नोटांस तारण म्हणून जे रोखे आहेत त्यांपैकीं स्टर्लिंगच्या स्वरूपांत रिझर्व्ह बँकेनें मार्च, १९३९ अखेर इंग्लंडमध्यें सुमारें ५½ कोटि पौंड धारण केले होते; मे १९४४ अखेर ही रक्कम ७४½ कोटि पौंडांवर गेली. हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकाराकरितां ह्या देशांत केलेल्या खर्चाची भरपाई इंग्लंडमध्यें रिझर्व्ह बँकेस करण्यांत आल्यानें स्टर्लिंग शिलकेची रक्कम ह्या रीतीनें फुगली असल्याचें त्यांनीं सांगितलें. कांहीं ब्रिटिश पत्रांनीं ह्या हिंदी शिलकांची विल्हेवाट कशी व्हावी ह्या विषयीं सूचना केल्या आहेत, त्या हिंदुस्थानच्या आर्थिक हितास अनुकूल नसल्याचें दिसतें, तरी असल्या योजनांचा स्वीकार ब्रिटिश सरकार करणार नाहीं अशा आशयाचें आश्वासन सर जॉन देतील काय ? असा मार्मिक प्रश्न एका कामकरी प्रतिनिधी सभासदानें विचारला असतां प्रश्नोत्तराच्या स्वरूपांत प्रस्तुत प्रकारच्या विषयाची चर्चा करतां येणें शक्य नाहीं असा खुलासा त्यास मिळाला.

जागतिक चलन परिषदेंत हिंदी प्रतिनिधी वरील प्रश्न उपस्थित करून तीमध्यें मान्य व्हावयाच्या आंतरराष्ट्रीय योजनेंत हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका ह्या देशास सुरळीतपणानें परत मिळूं शकतील अशा रीतीच्या व्यवस्थेचा अंतर्भाव केला जावा असा आग्रह धरतील ह्या बातमीनें ब्रिटिश धंदेवाले आणि त्यांचीं मुखपत्रें गडबडून गेलीं आहेत. हें वरील प्रश्नोत्तरांवरून स्पष्ट होतें. हिंदी प्रतिनिधींनीं चलन परिषदेंत हिंदी शिलकांचा प्रश्न उपस्थित केला तरी त्याची चर्चा व निकाल होण्यास तिची मान्यता मिळेल असा रंग दिसत नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं असले प्रश्न त्यांच्यांशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या देशांनीं परस्पर विचार-विनिमय करून सोडवावे आणि त्यांचा जागतिक चलन व्यवस्थेंत अंतर्भाव होण्याचें प्रयोजन नाहीं, असें आपसांत ठरवलें असावें असें वाटण्यास जागा आहे. हिंदी प्रतिनिधी सर चिंतामणराव देशमुख व सर षण्मुखम चेट्टी, ह्यांच्या अलीकडील भाषणांवरून आणि हिंदी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळानें परिषद संपल्यावर इंग्लंडला जाऊन ब्रिटिश सरकाराशी ह्या देशाच्या वतीनें बोलणीं करावीं अशी सूचना पुढें आली आहे तीवरून निघणारें अनुमान स्पष्ट आहे. परिषद आणि तिची योजना ह्यांच्या कक्षेंतून आणि स्थापन व्हावयाच्या आंतरराष्ट्रीय बँकेच्या व्यवहारांच्या कक्षेंतून हिंदी स्टर्लिंग शिलकांचा प्रश्न निसटला म्हणजे त्याचा निकाल प्रामुख्यानें इंग्लंडच्या मर्जीवर आणि सोयीवर अवलंबून रहाणार हें उघड आहे. इंग्लंडची सोय हिंदुस्थाननें पाहूं नये आणि आमचा पैसा आम्हीं सांगूं त्या मालाच्या स्वरूपांत किंवा सोन्याच्या व अमेरिकन डॉलर्सच्या व इतर रूपांत आम्हांस तात्काळ द्या असा हिंदी लोकांनीं आग्रह धरूं नये ही गोष्ट कोणासहि पटण्यासारखी आहे. पण हिंदुस्थानच्या युद्धोत्तर काळांतल्या औद्योगिक अभिवृद्धीच्या योजना व्यवस्थित रीतीनें पार पडण्यास सहायक होईल अशा मार्गानें हिंदी शिलकांचा विनियोग केला जाण्याचें अगत्य मान्य झालेंच पाहिजे. नाहींतर हिंदुस्थानचा स्वार्थत्याग फुकट जाणार आहे. हिंदुस्थाननें कोणती योजना स्वीकारावी ह्याविषयींचें ब्रिटिश धंदेवाल्यांचें म्हणणें तरी काय आहे ? त्यांची बाजू " फिनॅन्शल न्यूज " ह्या पत्रानें स्पष्ट पुढें मांडली आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं हिंदुस्थानची स्टर्लिंगमधली बाकी व्यापारी देवघेवींत निघालेली नसल्यानें तिची फेड नेहमीच्या देण्याघेण्याच्या व्यापारी व्यवहार पद्धतीनें केली जाऊं नये. असें न केल्यास इंग्लंडला २०० कोटि पौंडांचें आंतरराष्ट्रीय कर्ज काढून स्टर्लिंगमधल्या लंडन येथील बाक्या चुकत्या कराव्या लागतील आणि असें करणें त्या देशाच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. मागील महायुद्धानंतर मि. बॉल्डविन ह्यांनीं अमेरिकेच्या कर्जाविषयीं ह्या प्रकारची व्यवस्था केली होती, ती अयशस्वी ठरून सोडून द्यावी लागली ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून तीपासून आतां इंग्लंडनें बोध घेतला पाहिजे असें " फिनॅन्शल न्यूज " नें सुचवलें आहे. तटस्थ राष्ट्रांच्या स्टर्लिंग बाक्या सोन्याच्या किंवा हुंड्यांच्या स्वरूपांत परत न देतां मालाच्या स्वरूपांत सवडीप्रमाणें देऊन टाकणें योग्य आहे आणि ह्या पैशास व्यापारी व्यवहारांतल्या बाकींचें स्थान

देण्यास हरकत नाहीं. अमेरिकेसहि ह्या पद्धतीचा अवलंब करण्याची सवड पाडावी लागेल हें उघड आहे. परंतु ब्रिटिश साम्राज्यांतील देशांच्या स्टर्लिंग बाकयांस हा नियम लागू करून चालावयाचें नाहीं ह्या विचारसरणीवर "फिनॅन्शल न्यूज "नें विशेष जोर दिला आहे. हें पत्र म्हणतें, "प्रस्तुत युद्धांत ह्या देशांनीं आपलें सर्व बळ एकवटलें असल्यानें त्यांनीं परस्परांच्या देण्याघेण्याच्या बाबतींत कायदेशीर काटेकोरपणानें वागतां कामा नये. ह्या बाबतींत कॅनडानें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे. इंग्लंडला पुरवलेल्या युद्धसामुग्रीचे पैसे त्यानें सोडून दिले असून हिंदुस्थानाप्रमाणें लंडनमध्यें शिलका जमवलेल्या नाहींत. हिंदुस्थान सरकारनें स्वतः पुरवलेल्या मालाचे पैसे इंग्लंडकडून चोपून घेतले आहेत आणि ते सबंद ह्या देशांत परत यावेत अशी खटपट चालवली आहे. वास्तविकरीत्या हिंदुस्थान सरकारनें करांच्या व अंतर्गत कर्जांच्या मार्गानें पैसा उभारून लंडनमध्यें स्टर्लिंग बाकया न साचूं देण्याची खबरदारी घेणें आवश्यक होतें. हें तर त्याच्या हातून झालेंच नाहीं, पण उलट हिंदी धंदेवाले सबंद स्टर्लिंग शिलका परत मिळण्याविषयीं ओरड करीत आहेत. ह्या पैशांतून हिंदुस्थाननें ब्रिटिश माल खरेदी करून बाकया हळुहळु फेडून घ्याव्या ही इंग्लंडच्या नुकसानीची पण हिंदी राष्ट्राच्या फायद्याची सूचनाहि त्यांस रुचत नाहीं."

हिंदुस्थानचा पैसा परत देण्याचें इंग्लंडनें नाकारावें आणि ह्या देशानें त्याची अपेक्षा करूं नये असें सुचवणें अयोग्य असून आपण तशी सूचना करीत नाहीं, असें म्हणून "फिनॅन्शल न्यूज "नें एक तडजोडीची योजना पुढें मांडली आहे. स्वतःच्या शिलकेपैकी कांहीं पैशाच्या मोबदल्यांत ह्या देशानें ब्रिटिश माल घ्यावा आणि बाकीची रकम नडी–आडीच्या प्रसंगीं उपयोगांत आणण्यासाठी बिनव्याजी लंडनमध्यें पडून राहूं द्यावी अशी ही सूचना आहे. इंग्लंडनें हिंदुस्थानचें कर्ज देण्याचें नाकारावें असा ह्या योजनेचा उद्देश नसला तरी तिला सन्मान्य तडजोड म्हणणें हा शब्दांचा दुरुपयोग आहे. स्टर्लिंग बाकया निघण्यांत हिंदी जनतेस मोठा स्वार्थत्याग करावा लागला आहे हें सर्वमान्य आहे. ब्रिटिश पत्रांनीं तें नाकारण्यांत अर्थ नाहीं. युद्धोत्तर आर्थिक अभिवृद्धीच्या मार्गानें महागाईच्या ह्या आपत्तीचें परिमार्जन होण्याची संधि हिंदी जनतेस मिळावी आणि त्याकरितां स्टर्लिंग शिलकेचा विनियोग करतां यावा अशी अपेक्षा बाळगण्यांत काय वावगें आहे? इंग्लंडची परतफेडीविषयींची सोय अवश्य पहा, पण तोंडानें नाहीं म्हणावयाच्या ऐवजी हातांनीं नाहीं म्हणण्याची योजना पुढें करून तिला तडजोडीचें नांव देऊं नका असें हिंदी टीकाकार ब्रिटिश धंदेवाल्यांस व त्यांच्या मुखपत्रांस सांगत आहेत. ह्या हिंदी लोकमताचा योग्य परामर्श ब्रिटिश सरकारानें घेतला पाहिजे. हिंदुस्थान सरकार ह्या देशाची सरळ बाजू उचलून धरील अशी हिंदी जनतेस आशा वाटत आहे.

## बँकांच्या कायद्यांत दुरुस्ती

इंडियन कंपनीज (अमेंडिंग) ॲक्ट, १९४४ ह्याला गव्हर्नर जनरलची मान्यता ता. ७ मार्च १९४४ रोजीं मिळाली. हा कायदा १ जुलै १९४४ पासून अंमलांत येईल, असें हिंदुस्थान सरकारच्या गॅझिटांत जाहीर करण्यांत आलें आहे. ह्या दुरुस्त कायद्याची पार्श्वभूमि खालीलप्रमाणें आहे. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर हिंदी बँकिंगचा धंदा घेत असलेलें वळण ध्यानांत घेऊन, सदरहु धंदा योग्य रीतीनें नियंत्रित करण्यासंबंधींचे आपले विचार रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डानें डिसेंबर १९४२ मध्यें हिंदुस्थान सरकारास कळविले. युद्धकाळांत बँकिंगचा विस्तृत कायदा करण्याचें काम हातीं घेणें सरकारास शक्य वाटलें नाहीं, तेव्हां रिझर्व्ह बँकेनें अत्यंत महत्त्वाच्या अशा सुधारणा सरकारास सुचविल्या, त्यांचे आधारावर सरकारनें कंपनी–कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल मध्यवर्ती विधिमंडळांत मांडलें. बँकांची व्यवस्था मॅनेजिंग एजंटांकडे असूं नये, हें तत्त्व कंपनी–कायद्याच्या २७७ व्या कलमांत अंतर्भूत आहे, परंतु मॅनेजिंग एजन्सीच्याच धर्तीवर मॅनेजिंग डायरेक्टरांचे करार होण्याची प्रवृत्ति बळावत चालली व कायद्याचा उद्देश विफल होऊं लागला. मूळ कायद्याच्या धोरणाशीं विसंगत असलेले करार अशक्यप्राय करणारी दुरुस्ती आतां कंपनी-कायद्यांत करण्यांत आली आहे. बँकेच्या व्यवस्थापकाचें वेतन कोणत्याहि प्रकारें तिच्या नफ्यावर अवलंबून रहातां कामा नये, व्यवस्थापकाचा बँकेशीं करार एका वेळीं ५ वर्षांपेक्षां ज्यास्त मुदतीचा असतां कामा नये, वगैरे नियम आतां कायद्यांत समाविष्ट करण्यांत आले आहेत. व्यवस्थापकाच्या कराराची मुदत प्रत्येक वेळेस ५ वर्षांपेक्षां ज्यास्त नाहीं, अशा प्रकारें कितीहि वेळां वाढविण्यास कायद्यानें प्रतिबंध केलेला नाहीं.

कंपनी-कायद्यांत दुसरी महत्त्वाची दुरुस्ती बँकांच्या भाग भांडवलासंबंधांत आहे. अधिकृत, विकलें गेलेलें व वसूल भांडवल ह्यांत १०० : ५० : २५ अशा प्रकारची प्रमाणबद्धता पाहिजे, म्हणजे विकलें गेलेलें भांडवल अधिकृत भांडवलाच्या किमान ५०% व वसूल भांडवलाच्या किमान ५०% पाहिजे, असा नियम करण्यांत आला आहे. वसूल भांडवल थोडें असतांना अधिकृत भांडवलाच्या रुबाबदार आंकड्यांची भरमसाट जाहिरात करून लोकांची दिशाभूल करणें बँकांना ह्यापुढें शक्य होणार नाहीं. बँकेच्या भागांची ऑर्डिनरी, प्रेफरन्स व डिफर्ड भागांत वांटणी करून व त्यांची दर्शनी किंमत उत्पादकांच्या सोईप्रमाणें ठेवून बँकेचीं सूत्रें कांहीं मूठभर लोक आपल्या हातीं ठेवण्याचा प्रयत्न करतात, ही गोष्ट बँकिंगच्या धंद्याचे उत्कर्षाचे दृष्टीनें अनिष्ट आहे. लहान रकमांचे डिफर्ड भाग काढून, एकाद्या वर्षीं मोठा नफा दाखवून डिफर्ड भागवाल्यांची चंगळ करणें ह्यापुढें शक्य होणार नाहीं; कारण बँकांचे सर्व भाग फक्त ऑर्डिनरीच असले पाहिजेत, असें दुरुस्त कायदा सांगतो. दुरुस्त कायदा अंमलांत येण्यापूर्वी प्रेफरन्स भाग विकले गेलेले असल्यास, त्या भागवाल्यांचे हितसंबंध मात्र कायम रहाणार आहेत. भागीदारांनीं भरलेल्या भांडवलाचे प्रमाणांतच त्यांस मताधिकार मिळाला पाहिजे, अशीहि दुरुस्ती करण्यांत आली आहे. लहान रकमांचे कांहीं भाग काढणें, कांहीं भागांवरील भांडवलाची वसुली फारच थोडी करणें, इत्यादि मार्गांनीं थोड्या रकमेच्या आधारावर पुष्कळ मतें ताब्यांत ठेवणारांच्या कारवायांस त्यामुळें पायबंद बसणार आहे. भागीदारानें भरलेल्या रकमेच्या प्रमाणांत त्यास मतांचा अधिकार मिळाला पाहिजे, ह्याचा अर्थ भागीदारांच्या कमाल मताधिकारावरील नियंत्रण बेकायदा आहे, असा होईल किंवा काय हा प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. कित्येक बँकांच्या नियमांत भागीदारांनीं कितीहि भाग घेतले असले तरी त्यांस दहा, पंचवीस, पन्नास, शंभर वगैरेपेक्षां अधिक मतें असूं नयेत अशी व्यवस्था असते. त्याचा उद्देश कांहीं थोड्या भागीदारांकडे मताधिक्य जाऊं नये असा असतो. भागीदारांस त्यांच्या रकमेच्या प्रमाणांत मताधिकार मिळालाच पाहिजे, कमी रकम भरणारास ज्यास्त अधिकार मिळतां कामा नये; ह्याबरोबरच मोठी रकम भरणारांसहि त्यांच्या रकमेच्या प्रमाणांत अधिकार मिळाला पाहिजे, त्यांच्या अधिकाराचें नियंत्रण होतां कामा नये, असा दुरुस्त-कायद्याचा मथितार्थ आहे असें दिसतें.

१५ जानेवारी १९३७ नंतर स्थापन झालेल्या बँकांवरच भागांची वाटणी, वसुली व मताधिकार ह्यासंबंधांतील वरील दुरुस्तीची अंमलबजावणी होणार आहे व त्यांना आपल्या नियमांत योग्य तो बदल करण्यास दोन-वर्षांचा अवधि देण्यांत आलेला आहे.

# स्फुट विचार

## हिंदी बँकांचें मंडळ बनविण्याची योजना

हिंदुस्थानांतील बँकांनीं स्वतःच्या हितरक्षणासाठी आणि आपल्या व्यवहारासंबंधानें उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल परस्पर-विचारानें करावा म्हणून त्यांचें एक मंडळ स्थापलें जावें ही कल्पना मुंबईमध्यें बराच काळ सूचनेचा व चर्चेचा विषय होऊन बसली होती. अखेर इंडिअन मर्चंटस चेंबरचे अध्यक्ष, शेठ प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांच्या नेतृत्वानें गेल्या आठवड्यांत प्रमुख बँकांच्या प्रतिनिधींची प्रास्ताविक सभा भरून तींमध्यें अशा मंडळाच्या स्थापनेची योजना तयार करण्यासाठी एक समिति नेमण्यांत आली. मुंबईमधील प्रमुख शेड्यूल्ड बँकांच्या प्रतिनिधींचा ह्या समितींत अंतर्भाव करण्यांत आला आहे. हिंदी बँकांच्या मंडळाची मूलभूत कल्पना सामान्यतः मान्य झाल्यास तिच्या घटनेचा मसुदा समितीनें तयार करावयाचा असून तो गेल्या आठवड्यांत भरलेल्या सभेच्या दुसऱ्या बैठकींत पुढें मांडण्यांत येईल. परस्थ एक्सचेंज बँकांची स्वतःची स्वतंत्र घटना आहे आणि ह्या संस्था सर्व बाबतींत सहविचारानें व एकमतानें वागत असतात. हिंदी लोकांनीं चालविलेल्या बँकांच्या हिताचे अनेक प्रश्न आहेत आणि वारंवार उत्पन्न होतात. परदेशांतील बँकिंगमध्यें व आंतरराष्ट्रीय देवघेवींत ह्या बँकांचा हिस्सा फारच अल्प आहे. ह्या क्षेत्रांत प्रगति करण्यासाठी त्यांस संघटित प्रयत्न करतां येण्यासारखे आहेत. तसेंच, बँकिंगच्या धंद्याचे संबंधांत नवीन कायदा होणें अपरिहार्य आहे आणि त्याचें स्वरूप कसें असावें हें ठरवण्यांत ह्या बँकांनीं योग्य भाग घेणें आवश्यक आहे. आपला धंदा प्रगतिपर व सुरळीत रीतीनें चालण्याकरितां कोणत्या मार्गांचा व पद्धतींचा अवलंब करावा हेंहि सर्वांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांस निश्चित करतां येण्याजोगें आहे. सर्व प्रमुख बँकांनीं होऊं घातलेल्या मंडळास मनःपूर्वक पाठिंबा दिला तरच त्याचा खरा उपयोग होणार आहे. तसेंच, मध्यम व लहान आकाराच्या बँकांच्या अडचणी आणि त्यांच्या हिताचे प्रश्न ह्यांचा विचार मंडळ करील किंवा कसें ह्याची सदरहु संस्थांस शंका येणें स्वाभाविक आहे. मोठ्या बँकांचें ह्या मंडळाच्या निर्णयांत प्राबल्य होणें स्वाभाविक आहे. होऊं घातलेल्या मंडळाची घटना तयार होत असतां ह्या गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला जाणें अगत्याचें आहे. मंडळ मोठ्या बँकांचें होणार का सर्व लहान-मोठ्या बँकांचें बनवलें जाणार, त्याच्या कार्यकारी मंडळाची रचना कशी रहाणार आणि लहान-मोठ्या बँकिंगच्या संस्थांच्या उपयोगाची कोणती कामगिरी तें करणार आहे, ह्याचा खुलासा होणें आवश्यक आहे.

---

## अमेरिकन चांदी हिंदुस्थानांत आली

चांदीचे भाव ह्या देशांत किती चढले आहेत आणि मध्यंतरीं ते किती भडकले होते हें आतां सर्वश्रुत आहे. ह्या देशांत सामान्य लोकांची प्रवृत्ति चांदी खरेदी करून तिचे दागिने बनवण्याकडे असते. बायकामुलांस चांदीच्या दागिन्यांनीं सजवून स्वतःची बचत अशा रीतीनें गुंतवून ठेवण्याचा हिंदी जनतेचा प्रघात आहे. युद्धपरिस्थितींत लोकांनीं आपला शिलकी पैसा सरकारी गेरूयांत गुंतवणें त्यांच्या व देशाच्या हिताचें आहे असा प्रचार होत आहे तरी वरील प्रवृत्तीस विशेष आळा बसलेला नाहीं. चांदीच्या महागाईस चलन-विस्ताराबरोबर ह्या धातूचा मर्यादित पुरवठा हेंहि कारण आहे. सोन्याची किंमतहि चांदीप्रमाणेंच चढलेली आहे आणि तिला आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँक दर आठवड्यास दक्षिण आफ्रिका व अमेरिका ह्यांचे वतीनें सोनें विकीत आहे. ह्या राष्ट्रांचें हिंदुस्थानचें देणें फेडण्यास ह्या विक्रीचा उपयोग होत असून जनतेच्या हातांतील चलन आकर्षून महागाईस आळा घालण्यासहि त्याची मदत होत आहे. सोन्याप्रमाणें चांदीहि आयात करतां येऊन ती येथें विकली गेल्यास ह्या धातूचा पुरवठा वाढून त्याची किंमत मर्यादित होऊं शकेल हें उघड आहे. ह्या मार्गाचा अवलंब हिंदुस्थान सरकारनें आतां केला आहे. चांदीचा मोठा सांठा अमेरिकेंत आहे आणि त्यांतूनच ह्या देशांत आयात होणें शक्य होतें. मागील महायुद्धांत चांदीचा तुटवडा पडून नवीन रुपये पाडणें आणि त्यांचा पुरवठा लोकांस करणें कठिण झालें होतें तेव्हां ह्या कठिण परिस्थितीस तोंड देण्यासाठी सरकारनें अमेरिकेकडून चांदी घेतली होती आणि हिंदी चलनव्यवस्थेचा बचाव केला होता. प्रस्तुत प्रसंगींहि अमेरिकन चांदी आणण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकारच्या चलनपुरवठ्यास सहाय देऊन ह्या देशाचें युद्धकार्य सुकर व्हावें म्हणून अमेरिका येथील सरकारास दहा कोटि औंस इतकी चांदी उसनी देत आहे असें मि. मॉर्गेन थो, अमेरिकन तिजोरीचे चिटणवीस, ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. युद्धसमाप्तिनंतर ही चांदी हिंदुस्थान सरकार परत करील. अमेरिकन चांदी हिंदुस्थानांत उतरूं लागली आहे. ह्या आयातीचा परिणाम मुंबईच्या बाजारांत चांदीची किंमत तात्काळ उतरण्यांत झाला आहे.

---

## हिंदी चित्रपटांचा धंदा

हिंदुस्थानांत सध्या देशी चित्रपटांची चलती आहे हें नवीन झपाट्यानें निघणारे चित्रपट आणि त्यांवर लोकांच्या पडणाऱ्या उड्या ह्यांवरून सामान्य माणसाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. ह्या धंद्यांत गुंतलेलें भांडवल, त्यांत विविध काम करणाऱ्या लोकांची मोठी संख्या इत्यादि गोष्टींवरून चित्रपटांच्या धंद्यास स्वदेशी उद्योगामध्यें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. समाजहिताच्या आणि कला व तंत्र ह्यांचे दृष्टीनें ह्या धंद्यांत सुधारणेस पुष्कळ जागा आहे हें त्याच्या निस्सीम पुरस्कर्त्यांसहि मान्य करावें लागेल. युद्धोत्तरकालीन औद्योगिक प्रगतीमध्यें चित्रपटांच्या निर्मितीस किती व कोणता वाव असावा ह्या विषयींचे विचार सदरहु धंद्याशीं निकट संबंध असलेल्या लोकांच्या डोक्यांत येणें स्वाभाविक आणि आवश्यक आहे. सुधारणेचें कार्य सहविचारानें व संघटित रीतीनें झाल्यास तें इष्ट आहे. ह्या संबंधांत मुंबईच्या रोटरी क्लबांत श्री. के. एम. मोदी ह्यांनीं सांगितलेली माहिती उपयुक्त आहे. हिंदुस्थानच्या भावी आर्थिक प्रगतीशीं हिंदी चित्रपट व्यवसायाचें भवितव्य निगडित आहे हें त्यांचें म्हणणें अर्थपूर्ण आहे. आज लोकांच्या हातांत पैसा वाटेल तसा खेळत आहे ह्यामुळें चित्रपट पहाण्यास प्रेक्षकांची अनावर गर्दी होत आहे. उद्यां ह्या पैशास ओहोटी लागल्यास सिनेमाच्या धंदेवाल्यांस मंदीची झळ लागण्याचा संभव आहे. जनतेची प्राप्ती व चित्रपटांची कमाई

ह्यांचा निकट संबंध आहे आणि लौकिक अभिरुचिपेक्षां अधिक जवळचा आहे हें विसरून चालणार नाहीं. युद्धाच्या पूर्वीच्या काळांत हिंदी चित्रपटांचें वार्षिक उत्पन्न १६२ लक्ष रुपये होतें, तें १९४२-४३ मध्यें ८३ टक्के वाढ होऊन .५८६ लाखांपर्यंत वाढलें. १९४३-४४ सालचा आकडा इतकाच राहील, पण १९४४-४५ मध्यें तो ५११ लक्ष रुपयांवर खालीं येईल असा श्री. मोदी ह्यांचा अंदाज आहे. युद्ध चालू असे-पर्यंत उत्पन्नाचा हा आकडा कायम राहील असा त्यांचा अंदाज आहे. कच्ची फिल्म आणि इतर सामुग्री ह्यांच्या पुरवठ्यावर चित्रपटांची सांपत्तिक स्थिति बऱ्याच अंशांनीं अव-लंबून रहाणें स्वाभाविक आहे. तथापि, ह्या धंद्यांतल्या सुधारणा व त्याची प्रगति ह्यांचे बाबतींत कोणते विचार, व प्रयत्न चालू आहेत ह्या विषयींची माहिती श्री. मोदी ह्यांनीं आपल्या भाष-णांत सांगितलेली दिसत नाहीं. तांत्रिक व कलात्मक प्रगतीचे मार्ग शोधून काढून त्यांचा अवलंब सिनेमा व्यवसायिकांनीं करून स्वतःच्या धंद्याची उन्नति घडवून आणली पाहिजे.

## म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

वरील कंपनीस डिसेंबर १९४३ असेरच्या वर्षी घसारा, वॉर रिस्क विमा, मॅनेजिंग एजंटांचें कमिशन, इत्यादि भागवून १,७०,५०१ रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांस १२½% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे, त्यासाठी १ लक्ष रुपये लाग-तील. कंपनीचें खपलेलें व वसूल भांडवल ८ लक्ष रुपये आहे व तिचा रिझर्व्ह फंड २½ लक्ष रुपये झाला आहे. संयुक्त राष्ट्रांकरितां पॅरेशूटचें कापड तयार करण्याच्या योजनेंत कंपनीस अग्रस्थान आहे व कंपनीच्या कार्याचा झपाट्यानें विस्तार होत आहे. कंपनीच्या वाट्यास वरील योजनेंत ६०० बेसिन्स आलेलीं आहेत. कंपनीचे ठिकठिकाणीं कारखाने चालू आहेत. सिल्क कंट्रोल-ऑर्डरप्रमाणें, म्हैसूर संस्थानांत उत्पादन होणारें सर्व रेशीम नियं-त्रित किंमतीस सरकारास विकावें लागतें व म्हैसूर सरकार तें रेशीम संयुक्त राष्ट्रांचा प्रतिनिधी ह्या नात्यानें हिंदुस्थान सर-कारास विकतें. खासगी विक्री आजिबात बंद आहे, परंतु त्यास उपाय नाहीं. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी मेसर्स नाईक आणि कंपनीकडे आहे, तिचे प्रमुख भागीदार श्री. नारायणराव नाईक हे आहेत. श्रीराम सिल्क मिल्स लि.चेहि ते मॅनेजिंग एजंट आहेत. म्हैसूर सिल्क फिलेचर्सचे पुष्कळ भाग महाराष्ट्रीयांनीं घेतलेले आहेत व प्रो. वा. गो. काळे हे कंपनीचे एक डायरेक्टर आहेत.

## मराठा चेंबरची वार्षिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड इंडस्ट्रीजची १० वी वार्षिक साधारण सभा ता. १८ जून रोजीं भरली होती, तीमध्यें शके १८६५ च्या अहवालास मंजुरी व नवीन वर्षासाठीं पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, हिशेब तपासनीस, सल्लागार मंडळ ह्यांच्या निवडणुकी वगैरे कामें झालीं. चेंबरचे अध्यक्ष, श्री. न. ग. पवार हे उपस्थित नसल्याकारणानें एक उपाध्यक्ष, श्री. ग. रा. साठे, बिस्किट कारखानदार हे अध्यक्षस्थानीं होते. सभेमध्यें चेंबरच्या वाढत्या उपयुक्ततेबद्दल समाधान व्यक्त करण्यांत आलें. चेंबरची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत असून त्यास आश्रयहि समाधान-कारक मिळत आहे. अध्यक्षांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत चालू आर्थिक व औद्योगिक प्रश्नांचा उत्कृष्ट रीतीनें आढावा घेतला. पुढील वर्षाकरितां श्री. श्रीपादराव ओगले ह्यांना अध्यक्ष म्हणून निवड झाली. कार्यवाह श्री. आ. रा. भट व श्री. गो. द. आपटे ह्यांची पुनः निवड झाली व त्यांच्या उत्साही कार्याबद्दल सभेंत आभार मानण्यांत आले.

## सर पी. सी. रॉय ह्यांचें निधन

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ, डॉ. प्रफुल्लचंद्र रॉय हे आपल्या वयाच्या ८३ व्या वर्षी कलकत्ता येथें मरण पावले. एडिंबरो येथें त्यांनीं सहा वर्षे अभ्यास करून डी. एस. सी. ची पदवी मिळविली व हिंदुस्थानास परत येऊन कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजांत प्रोफेसर म्हणून ते दाखल झाले. हिंदुस्थानांतील रासायनिक व औषधी धंद्यांच्या स्थापनेंत त्यांनीं पुढाकार घेतला. बेंगाल केमि-कल अ‍ॅन्ड फार्मस्युटिकल वर्क्सची स्थापना व विस्तार हें त्यांच्याच परिश्रमाचें फळ आहे. साबण, कातडीं, इत्यादींच्याहि कारखा-न्यांस त्यांनीं चालना दिली. बंगालमधील १२ कंपन्यांचे ते डायरेक्टर होते. तांत्रिक शास्त्रीय संशोधन व त्याचा औद्योगिक राष्ट्रीय उपयोग ह्यांची जोड डॉ. रॉय ह्यांनीं घालून देऊन हिंदी औद्योगिक प्रगतीस त्यांनीं जोराची चालना दिली. त्यांचीं मतें राष्ट्रीय व प्रगमनशील होतीं व त्यांनीं आपल्या प्राप्तीचा विनियोग शास्त्रीय संशोधनाच्या पुर-स्काराकडेच केला. "हिंदु रसायनशास्त्राचा इतिहास" हा त्यांचा ग्रन्थ त्यांच्या कीर्तिप्रमाणेंच मोल्यवान् आहे. डॉ. रॉय हे अवि-वाहित होते. त्यांच्या मृत्युमुळें, रासायनिक आणि औद्योगिक प्रगतीच्या स्फूर्तीचा झरा नाहींसा झाला आहे. परंतु त्यांनीं दाख-वून दिलेल्या मार्गानें प्रगति होत आहे हें पाहून त्यांस समाधान वाटलें असलें पाहिजे.


## प्रगतीचें श्रेय आपणांकडे

**सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आलेलें काम | रु. २१, ४४, ४७१ | १९४२ | ५ लक्ष | ३ हजारानें |
| मंजूर काम | रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां | १ लक्ष ९० हजारानें | |
| पूर्ण विमा काम | रु. १६, १९, ७७५ | वाढ | ४ लक्ष | ७ हजारानें |

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा-योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक मॅनेजिंग डायरेक्टर

## महाराष्ट्राचे विमामहर्षि श्री. अण्णासाहेब चिरमुले ह्यांचा सन्मान

### सातारा येथील समारंभ

सातारा येथील सुप्रसिद्ध वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे अध्यक्ष आणि आरंभापासूनचे संगोपनकर्ते, महाराष्ट्राचे विमामहर्षि श्रीमान् वासुदेव गणेश तथा अण्णासाहेब चिरमुले यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण होऊन ८१ वें वर्ष लागलें यानिमित्त सातारा येथें त्यांच्या सत्काराचा समारंभ विमा कंपनीच्या मालकीच्या विस्तृत जागेंत घातलेल्या शोभिवंत मंडपांत मोठ्या थाटानें रविवार दिनांक ४ जून १९४४ या दिवशीं सायंकाळीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं अण्णासाहेबांच्या ब्रॉंझ पुतळ्याचें उद्घाटन आणि त्यांच्या चरित्राचें प्रसिद्धीकरणहि करण्यांत आलें. सत्कारसमारंभासाठी बाहेरून पुष्कळच पाहुणे आले होते.

श्री. चिरमुले ह्यांच्या गुणगौरवपर पद्यगायन, श्री. भाऊसाहेब सोमण ह्यांचें प्रास्ताविक भाषण, अध्यक्षांच्या सूचनेस श्री. रामभाऊ कुबेर ह्यांचें अनुमोदन, यशश्चिंतनपर संदेशांचें वाचन, श्री. चिरमुले ह्यांस सुमनहारांचें अर्पण, मानपत्राचें श्री. ल. मो. आपटे (कंपनीच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष) कृत वाचन, अहेर समर्पण, श्री. चिरमुले ह्यांस श्री. खाडिलकरकृत चरित्रग्रंथाचें समर्पण, प्रा. नारळकरांचें 'चिरमुले इन्शुअरन्स इन्स्टिट्यूट'ची माहिती देणारें भाषण, शिल्पकार तालीमकृत श्री. चिरमुले ह्यांच्या ब्रॉंझच्या अर्धपुतळ्याचें अनावरण, इत्यादि कार्यक्रम झाले.

### प्रसंगोचित भाषणें

यानंतर निरनिराळ्या मंडळींचीं प्रसंगास उचित अशीं भाषणें झालीं. प्रथमतः मुंबई प्रांताचे एक माजी पंतप्रधान सर धनजीशहा कूपर म्हणाले कीं, "आपल्या कुटुंबांतील माणसांचा वाढदिवस साजरा करतांना जो आनंद, जें प्रेम वाटतें तसा अनुभव आतां येत आहे. हिंदुस्थानांत मी ठिकठिकाणीं हिंडलों, तेथील लोकांत साताऱ्याची प्रसिद्धि दोन गोष्टींनीं असल्याचें मला आढळून आलें. एक ती मराठेशाहीची जुनी राजधानी म्हणून आणि सांप्रत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी तेथील म्हणून. वेस्टर्न इंडियाला या स्थितीला अण्णासाहेबांनीं आणलें. त्यांच्याच कर्तबगारीचें आणि श्रमाचें हें फळ आपण चाखीत आहों. १९१३ मध्यें ही कंपनी स्थापन झाली तेव्हां ओरिएंटल, एंपायर, हिंदुस्थान अशासारख्या कंपन्या इतक्या भरभराटलेल्या होत्या कीं, नवी कंपनी काढून त्यांच्याबरोबर टक्कर देऊन कंपनी सध्यांच्या स्थितीला आणणें अत्यंत श्रमाचें काम होतें. रात्रंदिवस तो विषय दृष्टीपुढें ठेवून हें काम त्यांस करावें लागलें. आपल्या चारित्र्याच्या बळावर अण्णासाहेबांनीं हें घडवून आणलें. ऐशीच्या वयाला असलेली त्यांची उत्कृष्ट प्रकृति, त्यांचे सद्गुण, त्यांची कार्यपद्धति या सर्व गोष्टी डोळ्यापुढें ठेवून आपण आणखी अनेक अण्णासाहेब निर्माण केले पाहिजेत."

यानंतर प्रि. महाजनी, मुंबईचे प्रसिद्ध शेअर ब्रोकर श्री. वर्दे, ओरिएंटल विमा कंपनीचे ॲक्चुअरी श्री. एस. एन. वैद्य, एफ. आय. ए., गजानन मिल्सचे मालक विष्णुपंत वेलणकर, वेस्टर्न इंडियाचे एक कर्तबगार एजंट एम. आर कुलकर्णी, कंपनीचे एक डायरेक्टर डॉ. आबासाहेब नातू, इत्यादिकांचीं अण्णासाहेबांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं.

### अध्यक्ष, श्री. मावळंकर, ह्यांचें भाषण

यानंतर समारंभाचे अध्यक्ष दादासाहेब मावळंकर यांचें भाषण झालें. ते म्हणाले "अलीकडे आपल्यांत ६१ वा वाढदिवस साजरा करण्याची प्रथा पडली आहे. त्या दृष्टीनें काम करण्यास मला पांच सहा वर्षांचाच अवधी राहिला आहे असें वाटत होतें, परंतु अण्णासाहेबांकडे पाहिलें म्हणजे अजून पुष्कळ वर्षे आपल्यापुढें आहेत असें वाटूं लागतें. त्यांनीं वयाच्या ४९ व्या वर्षी विमा कंपनी काढून ८१ व्या वर्षापर्यंत तिला उच्चावस्था प्राप्त करून दिली, ही त्यांची स्फूर्ति मी माझ्याजवळ ठेवीन. जगांत लोक पुष्कळ श्रीमंत आहेत. त्यांचें अभिनंदन आपण करीत नाहीं. ज्यांच्या कर्तृत्वाचा विनियोग दुसऱ्याकरितां होतो तेच पुरुष वंदनीय होत. अण्णासाहेबांनीं सर्व उद्योग निरपेक्षतेच्या भूमिकेवर उभे राहून विश्वस्त या नात्यानें केला. "या विमा कंपनींत कोणीही लक्षाधीश झाला नाहीं," हे उद्गार सर विश्वेश्वर अय्यांनीं काढलेच आहेत. सर्व समाजाच्या उन्नतीसाठी औद्योगिकरणाचा आदर्श त्यांनीं आपल्यापुढें ठेवला. हिंदुस्थानास आणि महाराष्ट्रास त्यांनीं नवा मार्ग दाखवून दिला. विमा कंपन्यांतून सांठणारा पैसा आपल्या राष्ट्रीय उद्धाराकडे कसा कारणी येईल याचा विचार झाला पाहिजे. युद्धोत्तर काळांत आपले धंदे जगावे अशी इच्छा असेल तर देशांत निर्माण झालेलीच प्रत्येक वस्तु वापरण्याचा निश्चय झाला पाहिजे. या निर्मितीस विमा कंपन्यांजवळ साचणारा निधि उपयोगी पडणें अवश्य आहे. तसेंच राष्ट्रीय आयुर्वृद्धीचें कार्यही विमा कंपन्यांना करतां येईल. अमेरिकेंत असे प्रयत्न चालल्याचें मी ऐकलें आहे. दीर्घायू विमेदारांपासूनच विमा कंपन्यांना भांडवलाचा अधिक लाभ होतो. म्हणून लोकांची आरोग्यकारक राहणी व्हावी म्हणून त्यांना तशीं घरें बांधून देणें, त्यांच्या आहारविहाराला आरोग्यवर्धक वळण लावणें या गोष्टी करण्यासारख्या आहेत. असो. महाराष्ट्रांत राजकारणी धैर्य आहे तसें औद्योगिक प्रांतांतहि आलें पाहिजे. अण्णासाहेबांनीं याचें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे."

### श्री. चिरमुले यांचें उत्तरादाखल भाषण

यानंतर उत्तरादाखल श्री. अण्णासाहेब यांचें भाषण झालें. ते म्हणाले "या प्रसंगीं आपण इतक्या समुदायानें येथें जमलां आहां यावरून 'सातारा स्वदेशी', 'वेस्टर्न इंडिया' आणि 'युनायटेड वेस्टर्न बँक' या तिन्ही संस्थांनीं चालविलेली जनसेवा आपणांस पटली आहे असें मी समजतों. आपण करीत असलेला गौरव व्यक्तिशः माझा दिसत असला तरी तो या संस्थांचाच असून मी प्रतीक मात्र आहे. ज्यांच्या सहकार्यामुळें या संस्था नांवारूपास आल्या त्या सर्वांना याचें श्रेय आहे. आतां आपणांस अशी विनंति करावयाची आहे कीं, आयुर्विमा कंपन्या आतां पुष्कळ निघाल्या आहेत. त्यांनीं आतां परस्पर स्पर्धा टाकून परस्पर विचारविनिमय करून आपली संघटना करावी आणि एकमेकांस साहाय्य करावें. संघटनेमुळें सर्वांगीण सुधारणा होऊन दुसऱ्या अनेक आवश्यक आणि उपयुक्त संस्था निर्माण होतील. उदाहरणार्थ, 'रिइन्शुअरन्स' कंपनी. तसेंच देशांतील उद्योगधंद्यांसही साहाय्य करणाऱ्या एखाद्या संस्थेची गरज आहे. असो. आपण मला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अहेर म्हणून दिला आहे त्याचा सादर स्वीकार करतों."

श्री. अण्णासाहेबांच्या अशा भाषणानंतर डॉ. प्रो. ना आपटे यांनीं आलेल्या सर्वांचे, समारंभास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे, तसेंच चरित्रग्रंथ फार उत्तम लिहिल्याबद्दल श्री. खाडिलकरांचे आभार मानले. त्यानंतर सौ. इंदिराबाई खाडिलकर यांनीं वंदेमातरम् गीत म्हटल्यानंतर समारंभ समाप्त झाला.

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यावर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरनेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील

### आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

## ★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स, टूथ पेस्ट, टूथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.